सकाळ
कोल्हापूर, बुधवार, १४ जानेवारी २०२६

# हरिष तोरसकर विद्यापीठ हॉकी संघात



हरिष तोरसकर

कोल्हापूर : भोपाळ येथील आंतरविद्यापीठ हॉकी स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ संघात हरिष तोरसकर याची निवड झाली. तो विवेकानंद महाविद्यालयाचा विद्यार्थी व छावा मित्र मंडळचा खेळाडू आहे. त्याला विजय साळोखे, दि डिस्ट्रिक्ट हॉकी असोसिएशनचे सचिव सुदाम तोरसकर, क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.

दैनिक जनप्रवास बातम्यांचा राजा

• बुधवार, दि. १४ जानेवारी २०२६

# युवकांनी वाचनातून विवेकाचा विचार अंगीकारावा



• विनायक होगाडे यांचे आवाहन

**जनप्रवास : कोल्हापूर**

निसर्ग आणि मानव यांच्यातील संघर्ष तीव्र झाला आहे. त्याचबरोबर सद्याच्या काळात कृत्रिम बुध्दिमत्तेचे महत्व वाढते आहे. अशा काळात माणसाने मेंदूचा वापर करुन माणसाशी माणसासारखे वागले पाहिजे. युवा पिढी मोबाईलच्या कहयात गेली आहे. या युवा पिढीने वाचनाकडे लक्ष देऊन विवेकाचा विचार अंगीकार करावा, असे आवाहन विनायक होगाडे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमधील इंग्रजी विभाग, वाड्.मय मंडळ आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित संवाद लेखकाशी या उपक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय थोरात होते. डॉ. श्रुती जोशी यांची उपस्थिती होती.

होगाडे म्हणाले, तरुण लेखकांनी आपली मूळ संस्कृती विसरता कामा नये. इतरांचे अनुकरण न करता वेगळया वाटा धुंडाळायला हव्यात. लेखनासोबत लेखकाकडे जबाबदारी येत असते. सामाजिक अस्वस्थता लेखकाला लिहिण्यास प्रवृत्त करीत असते. डॉ. थोरात म्हणाले, साहित्याच्या माध्यमातून लेखक मानवी भावना व्यक्त करीत असतो. साहित्य आपल्याला नवनवीन विचार देत असते. साहित्यातून आपल्याला इतिहास, संस्कृती याची जाणीव होत असते. परंतु दुर्दैवाने आजच्या डिजिटल युगात साहित्य वाचन कमी होत आहे. पुस्तकांची जागा मोबाईल आणि टीव्हीने घेतली आहे. प्रास्ताविक इंग्रजी विभागप्रमुख डॉ. कविता तिवडे यांनी केले. सानिका पलंगे हिने ओळख करुन दिली. आभार पार्थ पोवार याने मानले. सूत्रसंचालन संजना पाटील हिने केले. यावेळी डॉ. सुप्रिया पाटील, डॉ. स्नेहल वरेकर, डॉ. प्रदीप पाटील, दीपक तुपे, डॉ. अवधूत टिपुगडे, डॉ. सिध्दार्थ कट्टीमनी, डॉ.आरिफ महात, प्रा. सनी काळे उपस्थित होते.